# ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दूरध्वनी क्र. : ०२३१-२६६६००१, २६६६००२
फॅक्स क्र. : ०२३१- २६६६००१
E-mail : cgrfkolhapur@mahadiscom.in

महावितरण

कोल्हापूर परिमंडल,
विद्युत भवन", २रा मजला,
ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३.

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६९/२०१२-१३/१०२ दिनांक :१३.३.२०१३

| | | |
|---|---|---|
| १) | मे. चेअरमन, (केस क्र. १६९/१२-१३),<br>भगतसिंग वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित,<br>आरळे, पो. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, कोल्हापूर | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण २ विभागीय कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, कोडोली, जि. कोल्हापूर | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

भगतसिंग वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित,आरळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ही वि.प.ची ग्राहक संस्था आहे. तक्रारदार ग्राहकाने आपले अध्यक्ष व मॅनेजर यांच्यामार्फत मंचाकडे दि. २१.१.२०१३ रोजी वितरण कंपनी कोडोली उप विभाग, कोल्हापूर ग्रामीण विभाग १ यांचेविरुध्द मंचाकडे अनुसूची 'अ ' मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार भगतसिंग वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था यांचे ११ केव्ही एल.टी.अेजीचे तीन कनेक्शन्स अनुक्रमे २६२३३००४०९१, २६२३३००५१५१ व २६२३३००४०८२ आहेत.पूर्वी ग्राहकास २४ तास वीज पुरवठा होत होता, सद्या पुरेसा विद्युत पुरवठा होत नाही. वितरण कंपनीने एच.टी. ग्राहकास १६ तास व एल.टी. ग्राहकास ८ तास विद्युत पुरवठा केलेला आहे. विद्युत पुरवठ्याचे वेळापत्रक हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने गैरसोयीचे व चुकीचे आहे. संस्थेने ११ केव्ही लाईनवरुन विद्युत पुरवठा घेऊन मोटरपंपसेटच्या सहाय्याने पाणी उपसा करुन मोठ्या चेंबरमध्ये पाणी टाकलेले आहे. तेथून काही क्षेत्रास सायफन पध्दतीने पाणी दिलेले आहे, मात्र ज्या क्षेत्रास सायफनने पाणी जात नाही त्या ठिकाणी वेगळा विद्युत पुरवठा घेऊन मोटरपंपसेटच्या सहाय्याने पाणी उचलून दिले आहे. महावितरण कंपनीने अपुरा विद्युत पुरवठा केल्यामुळे शेतकऱ्यांना पुरेसा पाणी पुरवठा संस्थेमार्फत होऊ शकत नाही. त्यामुळे सभासद व संस्था संचालक मंडळ यांच्यामध्ये वारंवार वादाचे प्रसंग घडलेले आहेत. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. सकृतदर्शनी १ हेक्टर क्षेत्र भिजण्यास १६ तास विद्युत पुरवठा होणे गरजेचे आहे. वितरण कंपनीने हा मुद्दा बाजूला ठेवून व्होल्टेज मिळत नसल्याचे कारण पुढे केले आहे, ते चुकीचे, एकतर्फी घेतलेला निर्णय व काढलेले अनुमान आहे. वितरण कंपनी शेतकऱ्यांना सवलतीचे दराने वीज देण्यास उदासिन आहे, शेतकऱ्यांवर भार नियमन लादले आहे. यापूर्वी वारणा कारखाना पुरस्कृत १८ सहकारी पाणी पुरवठा संस्थेमार्फत पाडळी-पारगांव पाणी पुरवठा संस्थेच्या नांवे अंतर्गत कक्षाकडे १६ तास अखंडीत विद्युत पुरवठा व्हावा म्हणून अर्ज दाखल केलेला आहे. अंतर्गत कक्षाने तक्रारीचा विचार केलेला नाही, अंतर्गत कक्षाचे केलेले आदेश कायद्याला धरुन नाहीत ते रद्द करावेत अशी मागणी केली आहे. मंचाकडून अपेक्षित मदत - सन १९८८ पासून आजतागायत अनेक सहकारी पाणी पुरवठा संस्था व वैयक्तिक ग्राहकांना वीज पुरवठा दिल्याने संस्थेच्या फिडरवर अतिरिक्त भार झाले आहे. महावितरण कंपनीने यासाठी 11 kv link line for new likes (Ag) feeder at Kodoli sub station साठी एकूण ३९.६० कि.मी. वाहिनी पायाभूत विकास आराखड्यामध्ये मंजूर आहे. केवळ कॉन्ट्रक्टर सदरील काम करण्यास असमर्थ असेल किंवा कान्ट्रॅक्टर महावितरणच्या अटी व शर्ती प्रमाणे काम करीत नसेल तर, सदरील स्वतंत्र LIS फिडरच्या कामाचे खर्चाचे अंदाजपत्रक महावितरण कंपनीने विहीत वेळेत दुबार करुन देण्याचे आदेश कंपनीस द्यावेत. सदरील स्वतंत्र LIS फिडरचे महावितरण कंपनीच्या खर्चाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी या लिंक लाईनमध्ये समाविष्ट असलेले ग्राहक व महावितरण कंपनी या दोघांची असून सदरील काम हे स्थानिक कॉन्ट्रक्टर यांचेकडून करुन घेण्यात यावे. सदरील येणारा खर्च हा या लिंक लाईनमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व ग्राहकांनी स्वखर्चातून करुन घेणेचा आदेश व्हावा. सदरील कामाच्या खर्चाच्या रकमेचा परतावा संबंधित ग्राहकांना काम पूर्ण झालेनंतर वीज बिलातून कंपनीने सव्याज देण्याचे आदेश व्हावा अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २०.२.२०१३ च्या लेखी अहवालात भगतसिंग वारण सहकारी पाणी पुरवठा संस्थेसाठी शेतीस पाणी पुरवठा करणेकामी ५० अश्वशक्ती भाराचे ३ कनेक्शन्स १९८८ साली महावितरणकडून देण्यात आलेले आहेत. तक्रारदार संस्थेची कमी विद्युत दाबाची तक्रार दूर करण्यासाठी पायाभूत आराखडा योजने अंतर्गत ३९.६ कि.मी. उच्चदाब वाहिनी मंजूर असून ५ वर्षांचा कालावधी उलटूनही सदर वाहिनी उभारणीचे काम अद्याप हाती घेण्यात आलेले नाही असे तक्रारदार संस्थेचे म्हणणे आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

थोडक्यात, तक्रारदाराची मागणी स्वतंत्र फिडरसाठी असून पायाभूत आराखडा योजनाही सद्या अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधांचे सबलीकरण व भविष्यात येणाऱ्या नवीन ग्राहकांसाठी पायाभूत सुविधांची तरतूद करणेसाठीची योजना आहे. त्यामुळे अस्तित्वात असणाऱ्या काही ठराविक ग्राहकांसाठी स्वतंत्र वाहिनी उभारणीचे काम पायाभूत आराखडा योजनेअंतर्गत करण्यासारखे नाही. तक्रारदारांच्या कनेक्शनसाठी स्वतंत्र फिडर करावयाचे झाल्यास ते तक्रारदारांनी डीडीएफ योजनेअंतर्गत करुन घ्यावे, तक्रारदाराचे अपील फेटाळण्यात यावे अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २०.२.२०१३ रोजी घेण्यात आली. त्यावेळी भगतसिंग वारण सहकारी पाणी पुरवठा संस्थेचे सचिव श्री. चव्हाण व ग्राहक प्रतिनिधी श्री. विजय देसाई उपस्थित. वि.प.तर्फे श्री. आरळी, सहाय्यक अभियंता उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी श्री. देसाई यांनी सन २००८ पासून पूर्वी २४ तास सतत विद्युत पुरवठा होत होता, परंतु भार नियमन सुरु झाल्यापासून संस्थेत सभासद व संचालक मंडळ यामध्ये मतभेद होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. १६ तास विद्युत पुरवठा व्हावा ही मागणी आहे. पायाभूत आराखडा योजने अंतर्गत काम समाविष्ट असून अद्याप पूर्ण झालेले नाही, डी.डी.एफ. योजनेअंतर्गत काम करुन घेणे ग्राहकांना परवडणारे नाही, तांत्रिक अडचणी आहेत, तक्रार मंजूर करावी, १६ तास विद्युत पुरवठा करण्याचे आदेश वि.प.ला द्यावेत, ग्राहकाने केलेला खर्च विद्युत बिलातून समायोजित व्हावा असे म्हणणे मांडले. वि.प.चे अधिकारी श्री. आरळी, सहाय्यक अभियंता यांनी एनडीडीएफ हे नवीन ग्राहकासाठी आहे, ग्राहकाने खर्च करावा WCR प्रमाणे परतवा देऊ, अस्तित्वात असलेले कनेक्शन एनडीडीएफ मध्ये देता येणार नाही. मंचासमोर सुनावणी दरम्यान ग्राहक प्रतिनिधी व वि.प.चे अधिकारी यांनी आपसांत चर्चा करुन कांही मार्ग निघतो का ते पाहून मार्च २०१३ च्या पहिल्या आठवडयात म्हणणे सादर करण्याचे ठरले. वि.प.ने आपल्या दि. १२.३.२०१३ च्या लेखी अहवालात तक्रारदाराने ज्या परिपत्रक क्र. २५६८० दि. १९.६.२००८ चा संदर्भ दिला आहे ते परिपत्रक मा. आयोगाच्या केस क्र.७०/२००५ मधील आदेशानुसार भविष्यात येणाऱ्या नवीन कनेक्शनसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांची सोय करण्याकरिता,नवीन योजना तयार करण्यासंबंधीचे मार्गदर्शक तत्वे महावितरणकडून विहित करण्यात आले आहे. तक्रारदाराची मागणी फेटाळण्यात यावी. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. २१.५.२००८ चे परिपत्रक व इतर कागदपत्रे दाखल केली, त्यामध्ये प्रामुख्याने DPR कोडोली सब डिव्हीजन व मा. लोकपाल यांचे केस क्र. ३५, ३६ व ५१/२०१२ मधील आदेश दाखल केले आहेत.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे त्यांना १६ तास अखंडीत विद्युत पुरवठा एनडीडीएफ योजनेतून मंजूर करण्याचे आदेश वि.प.विरुध्द देणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही.

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार तक्रारदार ग्राहकांची भगतसिंग वारणा सहकारी पाणी पुरवठा संस्था असून ११ केव्ही एल.टी. अेजीचे तीन कनेक्शन्स घेऊन विद्युत पुरवठा होत आहे. अंतर्गत कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दि. २७.८.२०१२ ला तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी आपल्या अनुसूची अ मधील अर्जाचे मुद्दा क्र.५ मध्ये केलेल्या विधानानुसार वितरण कंपनीने एच.टी. ग्राहकास १६ तास व एल.टी. ग्राहकास ८ तास विद्युत पुरवठा केलेला आहे तो शेतकऱ्यांसाठी गैरसोयीचा व नुकसानीचा आहे. थोडक्यात, भार नियमनाविरुध्द मंचाकडे तक्रार दाखल केली आहे. १ हेक्टर क्षेत्र भिजण्यास १६ तास विद्युत पुरवठा होणे गरजेचे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. भार नियमन हा वि.प.च्या धोरणाचा भाग आहे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

वि.प.विरुध्द मंच एल.टी. ग्राहकांना १६ तास विद्युत पुरवठा द्यावा असे आदेश देऊ शकत नाही. तक्रारदार संस्थेस अखंडीत विद्युत पुरवठा मिळणे गरजेचे आहे, भार नियमनामुळे विद्युत पुरवठ्याचे वेळापत्रक निश्चितपणे गैरसोयीचे झाले आहे, पर्यायाने शेतकऱ्यांचे निश्चितपणे नुकसान होत आहे हे मंचास मान्य आहे. शेतकऱ्यांना अखंडीत १६ तास विद्युत पुरवठा उपलब्ध व्हावा या निर्णयाप्रत मंच आला असला तरी, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील तरतुदीनुसार मंच अखंडीत १६ तास विद्युत पुरवठा करावा असे आदेश वि.प.स देऊ शकत नाही.

पायाभूत विकास आराखड्यातील म्हणजे इन्फ्रा १ मधील नियोजित एलआयएस करिता स्वतंत्र फिडर मंजूर केलेला आहे. सदरील काम अस्टर कंपनीस दिले होते. अस्टर कंपनीने काम केलेले नाही, ते काम सत्वर सुरु करावे असे आदेश व्हावेत. वितरण कंपनीकडून व्होल्टेज कमी जास्त होणे किंवा व्होल्टेज न मिळणे या ग्राहकाच्या तक्रारीतील मुद्यास बगल देण्यात येत आहे. अंतर्गत कक्षाचे व्होल्टेज बाबतचे निरीक्षण चुकीचे आहे. यावरुन वि.प.ने आपल्या लेखी अहवालात तक्रारदाराची मागणी स्वतंत्र फिडरसाठी असून पायाभूत आराखडा योजनाही सद्या अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधांचे सबलीकरण व भविष्यात येणाऱ्या नवीन ग्राहकांसाठी पायाभूत सुविधांची तरतूद करणेसाठीची योजना आहे. त्यामुळे अस्तित्वात असणाऱ्या काही ठराविक ग्राहकांसाठी स्वतंत्र वाहिनी उभारणीचे काम पायाभूत आराखडा योजनेअंतर्गत करण्यासारखे नाही. तक्रारदारांच्या कनेक्शनसाठी स्वतंत्र फिडर करावयाचे झाल्यास ते तक्रारदारांनी डीडीएफ योजने अंतर्गत करुन घ्यावे ही बाब तक्रारदार ग्राहकांस डीडीएफ योजनेअंतर्गत खर्च परवडणारा नाही हे मंचासमोर स्पष्ट झाले किंवा ग्राहकाने डीडीएफ योजनेअंतर्गत स्वतंत्र फिडरचे काम करुन घ्यावे असे आदेश मंच देऊ शकत नाही. चर्चेअंती असे स्पष्ट झाले की, वि.प.ने आपल्या मुख्य कार्यालयाकडे आपल्या मागणी बाबत पाठ पुरावा करावाअसे मंचाचे मत झाले आहे. तक्रारीतील १६ अखंडीत विद्युत पुरवठ्याची मागणी मंचाचे अधिकारकक्षेत येत नसल्याने फेटाळण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे- पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही
( बी. जी. पवार )
अध्यक्ष

दिनांक :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com